सुलेमान इस्सा

विरुध्द

द स्टेट ऑफ बॉम्बे

(मेहरचंद महाजन सी.जे. दास विवियन बोस आणि गुलाम हसन न्यायमुर्ती )

फैाजदारी प्रक्रिया संहिता (१८९८ चा V) कलम ५१७ मुंबई जिल्हा पोलीस कायदा (१८९० चा मुंबई कायदा VI) कलम ६१ (इ) प्रमाणे व्यक्तिविरुध्द खटला भरण्यात आला - सुमारे ३ लाख रुये किमतीचे सोने जप्तीचे आदेश त्याचे औचित्य

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५१७ नुसार न्यायालयाला एखादया खटल्याच्या किंवा चौकशीच्या समाप्तीचे वळी, त्यांचेसमार सादर केलेल्या किंवा त्यांचे ताब्यातील किंवा ज्याच्या संदर्भात गुन्हा केल्याचे दिसते अशा किंवा ज्याचा वापर कोणताही गुन्हा करण्यासाठी करण्यात आला होता, अशा कोणत्याही मालमत्तेची किंवा दस्तऐवजाची विल्हेवाट लावण्यासाठीचे आदेश करण्याचा अधिकार आहे. विल्हेवाट लावण्यासाठीचे तसे अधिकार हे न्यायालयाच्या ताब्यात असलेली मालमत्ता जप्त करण्यापर्यन्त विस्तारले आहेत, परंतु न्यायालयाने प्रकरणाच्या परिस्थितीची पर्वा न करता असे जप्तीचे आदेश प्रत्येक प्रकरणात देणे आवश्यक नसते.

असे निर्णित केले की, सुमारे ३ लाख रुयाचे सोने जप्त करणेचे आदेश, हे सध्याच्या प्रकरणासारख्या प्रकरणात, जेथे संबंधीत सोन्याची आफिकेतुन भारतात तस्करी करण्यात आली होती असा सरकारी पक्षाचा दावा न्यायालयाने स्विकारलेला नाही आणि आरोपीला मुंबई जिल्हा पोलीस कायदा, १८९० च्या ६१ ई या कलमाखाली दोषी ठरवण्यात आले, ज्यासाठी जास्तीत जास्त तीन महिन्यांची शिक्षा आणि १०० पय्पयांच्या दंडाची तरतुर आहे आणि ज्यामध्ये समुद्री सीमा शुल्क कायदयासारखी जप्तीच्या दंड लादण्यासारखी कोणतीही लक्षणीय तरतुद नाही, त्यामध्ये देणे हे अयोग्य आहे.

**फैाजदारी अपील अधिकारक्षेत्र- फौजदारी अपील क्रमांक ६७/१९५१**

फौजदारी अपील क्रमांक ६८४ चे मुंबई उच्च न्यायलय (दिक्षित आणि जे.जे. चैनानी) यांचे २६ जुन १९५० रोजीच्या आदेशावय्न विशेष परवानगीषद्वारे दाखल केलेले अपील.

एन.सी. चॅटर्जी (एच.जे. उमरीगर आणि त्यांच्यासोबत एस.पी. वर्मा) अपीलकत्यार्साठी

भारताचे महाधिवक्ता एम.सी. सीतलवाड (त्यांच्यासोबत पोरस ए. मेहता ) उत्तरवादीकडुन

१९५४ मार्च ११ रोजी न्यायालयाचा न्यायनिपर्णय, द्वारे

गुलाम हसन जे. - पस्तुत अपील २६ जुन १९५० रोजीचे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती (दीक्षित आणि चैनानी जे.जे.) आदेशानुसार विशेष अनुमतीने दाखल केलेले अपील आहे,

ज्यामध्ये उच्च न्यायालयाने ७ मे १९४९ रोजी कैराच्या सत्र् न्यायाधीशांनी दिलेला, अपीलकत्यार्ंची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश् रदद केला आणि ३१ डिसेंबर १९४८ रोजी नाडियाड प्रांत उपविभागीय दंडाधिका-यांनी दिलेला अपीलकत्या्र ।चा दोषसिध्दीचा आणि शिक्षेचा आदेश पुर्नसंचयित कय्न मुंबई रोज्याचे अपील मंजुर केले होते.

अपीलकर्ता, सुलेमान इस्सा, जो दक्षिण आफ्रिकेतील नातालचा रहिवासी आहे, तो ऑगस्ट १९४७ मध्ये डर्बनहुन कारमधुन कैरा जिल्हयातील त्यांचे मुळ गांव सारसाला भेट देण्यासाठी भारतासाठी निघाला, जिथे त्याची बहीण, पती अली अहमद इसाक सोबत रहात होती. त्याच्यासोबत दाउद हस्साम हा त्याचा आणिखी एक मेहुणा होता आणि दोघेही गाडीने मोम्बासाला गेले. मोम्बासाहुन ते ३० ऑगस्ट रोजी बोटीने निघाले व ११ सप्टेंबर रोजी कोलंबोहुन मद्रासला उडडान केले परंतु गाडी एका स्टीमरद्वारे पाठविली. २० सप्टेंबर रोजी स्टीमर येईप र्य्न्त ते मद्रासमध्ये राहीले. १ ऑक्टोबर रोजी बेंगळुय, पुना, नाशिक आणि धुलियामार्गे मोटारीने नरडाणला रवाना झाले. तेथुन ते रेल्वेने प्रवास कय्न ८ ऑक्टोबर रोजी सारसाला पोहोचले. कार ही नरडाणाहून आनंदला जाणा-या खुल्या टकमध्ये बुक करण्यात आली होती, जिथे तिची डिलिव्हरी घेण्यात आली आणि नंतर ती सारसाला चालवीत नेण्यात आली.

नाडीयाद शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रतनसिंग कालूसिंग रावळ यांनी शहरातुन भारतीय क्रमांक नसलेली गाडी जात असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलीसांना लक्ष ठेवण्याच्या सुचना दिल्या. अपीलकत्यार्ला १२ ऑक्टोबर रोजी उपनिरीक्षकासमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले

होते. चौकशी दरम्यान त्याने सांगीतले की त्यांचे कुटूंब जामनगर राज्याचे मुळ रहिवासी होते. परंतु गेल्या ६० वर्षापासुन ते डर्बनमध्ये जमीन खरेदी आणि विक्रीसाठी कंत्राटदारांचा व्यवसाय करत होते. मात्र् त्याचा भाउ दाउद इस्सा मुंबईत नोकरी करीत होता. त्याने त्याच्या आणि त्याच्या साक्षीदाराने केलेल्या प्रवासाचा तपशील दिला आणि पारपत्रे तसेच सीमाशुल्क आणि ठेव भरण्याच्या पावत्या सादर केल्या. १५ ऑक्टोबर रोजी हेड कान्स्टेबल अजितसिंगने रावळला कळविले की कोणी अज्ञात व्यक्ति उमरभाई ज्वेलर्सच्या दुकानात मोठया प्रमाणात सोने घेवुन आली होती. त्यानुसार पोलीसांनी दागिने विकणा-याच्या आणि त्याच्या भावाच्या (जो एक दागिने विकणारा देखील आहे. ) दुकानाला भेट दिली आणि त्यांना समजले की अपीलकर्त्यार्ने त्याला वितळविण्यासाठी सोने दिले होते. दुस-या ठिकाणी ठेवलेल्या इतर काही सोन्यासह हे सोने पोलीसांनी जप्त केले. पोलीसांनी गाडीही ताब्यात घेतली. जप्त केलेल्या सोन्याचे एकुण वजन २७७३ तोळे होते ज्याचे मुल्य अंदाजे य्पये ३ लाख होते. भारतीय टेली्ग्राफ कायदयाच्या कलम २० अंतर्गत अपीलाथीर् व इतरांचे विय्ध्द, गाडीतील वायरलेस संच हा टान्समीटर होता, या ग्हितकावर कार्यवाही सुय् केली. परंतु ते अन्यथा आढळल्यावर कार्यवाही सोडुन देण्यात आली. गाडीची कसुन तपासणी करण्यात आली परंतु त्यात काहीही आक्षेपार्ह आढळले नाही. अपीलकर्त्यार्लाही सावर्जनिक रोखे कायद्यांतर्गत ताब्यात घेण्यात आले होते. परंतु त्याची सुटका करण्यात आली. अखेरीस २ जानेवारी १९४८ रोजी. रावळ यांच्या तक्रारीवय्न, मुंबई जिल्हा पोलीस कायदा (१८९० चा IV) कलम ६१ ई, सोबत भारतीय दंड सहिता कलम १०९ अंतर्गत गुन्हयाखाली ते आणि इतर यांचे विय्ध्द खटला करण्यात आला.

कलम ६१ ई म्हणतो की,

“जो कोणी एखादी मालमत्ता, ती चोरीला गेलेली मालमत्ता किंवा फसवणुक कय्न मिळवलेली मालमत्ता आहे असे मानण्याचे कारण आहे अशी त्याच्या ताब्यात बाळगेल किंवा कोणत्याही प्रकारे पोहचवेल किंवा विक्रिसाठी किंवा तारण म्हणुन देण्याचा प्रस्ताव देईल व जर तो अशा मालमत्तेच्या त्याच्या ताब्याचा हिशोब देण्यात अयशस्वी झाला किंवा त्याने न्यायदंडाधिका-यांच्या समाधानासाठीची कती केली नाही, तर त्याला तीन महीन्यापर्यन्तच्या तुरुंगवासाची किंवा शंभर रुपयापर्यन्तच्या दंडाची शिक्षा होवु शकते.

न्यायदंडाधिका-यांनी त्याला दोषी ठरवले आणि १०० रुपयाचा दंड ठोठावला आणि दंड प्रक्रिया संहितेच्या कलम ५१७ अंतर्गत सोने जप्त करण्याचे निर्देश दिले. चिथावणी दिणल्याचा आरोप असलेल्या इतर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. दंडाधिका-यांनी असे म मांडले की आरोपींनी चोरी केली होती किंवा फसवणुकीने मालमत्ता किळविली हे दर्शविण्यासाठी कोणताही थेट पुरावा नाही परंतु त्यांच्यामते संबंधीत सोने चोरीने किळविलेले किंवा फसवणुकीने मिळविलेले होते असा वाजवी विश्वास निर्माण करणारी परिस्थिती होती. सत्र न्यायालयाने निर्णय दिला की जरी सोन्याचा ताबा अत्यंत संशयास्पद असला तरी, मालमत्ता एकतर चोरीने मिळविलेली होती किंवा फसवणुकीने मिळवली गेली होती याबाबत वाजवी विश्वासासाठी, तो पुरेसा आधार नाही. तदनुर त्यांनी दोषसिध्दी आणि शिक्षा रदद केली आणि अपीलकत्यार्ला सोने परत देण्याचे आदेश दिले. राज्याने केलेल्या अपीलात उच्च शन्यायालयाने, अपीलकत्यार्ने त्यांच्या मोटारगाडीतुन सोने भारतात आणले होते ही फिर्यादीची कथा

स्विकारली नाही, परंतु दंडाधिका-यांशी सहमती दर्शवली की परिस्थितीनुसार त्यांच्याकडे मिळालेले सोने ही एकतर चोरीने मिळविलेली किंवा फसवुन किळवलेली मालमत्ता आहे असे मानण्याचे पुरेसे कारण आहे. उच्च न्यायालयाने अपीलकत्यार्ंचे स्पटीकरण की त्याच्या वडिलांनी त्याच्या मुळगावी भेट देतांना वेळोवेळी सोने सारसामध्ये आणले होते हे  स्विकारले नाही. कलम ५१७ अंतर्गत जप्तीच्या आदेशाच्या संबंधात, उच्च न्यायालयाने असे निर्णित केले की जप्त केलेली मालमत्ता ही ज्याच्या संदर्भात गुन्हा झल्याचे दिसते अशी मालमत्ता असणे आवश्यक नाही, परंतु ही मालमत्ता न्यायालयासमोर हजर केली गेली एवढी बाब पुरेशी आहे. या द्ष्टीकोनातुन निर्दोष मुक्तता रदद करण्यात आली आणि दंडाधिका-याचा आदेश पुर्नसंचयित करण्यात आला.

अपीलकत्यार्तर्फे श्री. चॅटर्जी यांनी सुरुवातीला सांगीतले की, अपीलकत्यार्ची दोषसिध्दी योग्य होती हे स्विकार करण्यास ते तयार नाहीत, परंतु तसे आहे या ग्रहहितकावरुन पुढे जावुन सांगीतले की कलम ५१७ या प्रकरणात लागु होणार नाही व न्यायालयाला सोने जप्त करण्याचे आदेश देण्याचे अधिकारक्षेत्र नाही व त्यांनी असेही आग्रही म्हणणे मांडले की कोणत्याही द्ष्टीकोनातुन जप्तीचा आदेश हा या प्रकरणाच्या परिस्थितीत योग्य आदेश नाही.

कलम ५१७  (१) असा आहे की,

‘‘तेव्हा कोणत्याही फौजदारी न्यायालयात चौकशी किंवा खटला संपतो तेव्हा न्यायालय त्याचेसमोर सादर केलेल्या किंवा त्याच्या ताब्यात असलेल्या किंवा ज्याच्या संदर्भात कोणताही गुन्हा केल्याचे दिसुन येते किंवा त्याचा वापर कोणत्याही गुन्हयाकामी करण्यात आला आहे, अशा कोणत्याही

मालमत्तेची किंवा दस्तऐवजाची विल्हेवाट (नष्ट करु जप्त करुन किंवा त्याचा ताबा घेण्याचा हक्क असल्याचा दावा करणा-या कोणत्याही व्यक्तिला वितरीत करुन) करण्याचे त्यांना योग्य वाटेल असे आदेश देवु शकते.

कलमाचे साधे वाचन असे दर्शविते की, चौकशी किंवा खटल्याचे समाप्तीनंतर न्यायालयाला त्याच्यापुढे सादर केलेल्या

किंवा त्याच्या ताब्यात असलेली

किंवा ज्याचा वापर कोणत्याही गुन्हयाकामी करण्यात आला आहे

अशा कोणत्याही मालमत्तेची किंवा दस्तऐवजाची विल्हेवाट जावण्याचे आदेश देण्याचा अधिकार दिलेला आहे.

हे कलम असेही दर्शवते की, न्यायालयाचे अधिकार हे सदर मालमत्ता नष्ट करणे जप्त करणे किंवा त्याचा ताबा घेण्याचा हक्क असल्याचा दावा करणा-या कोणत्याही व्यक्तिला वितरित करणे इथपर्यन्त विस्तारलेले आहेत.

श्री. चॅटर्जी यांनी असा युक्तिवाद केला की, पोलीसांनी सोने जप्त केल्यानंतर ते कोषागारात पाठविले होते किंवा ते पाठविण्यात आले होते आणि ते कधीही न्यायालयासमोर सादर करण्यात आले नव्हते. या मुदयाबाबत स्पष्ट आणि निश्चित पुरावा आहे असे आम्हाला वाटत नाही. हा मुददा खालील न्यायालयासमोर उपस्थित करण्यात आल्याचे दिसत नाही. मालमत्ता न्यायालयासमोर

सादर करण्यात आली या आधारावर उच्च न्यायालयाने आदेशाचे समर्थन केले आणि असे निर्णित केले की आदेश पारित करण्यापुर्वी त्याच्या संदर्भात "कोणताही गुन्हा केल्याचे दिसते" हे शोधणे आवश्यक नाही. आम्हाला हे स्पष्ट दिसते की, ती मालमत्ता अशी नव्हती जिच्या संदभा्रत असा कोणताही गुन्हा झाल्याचे दिसत होते किंवा जिचा वापर कोणत्याही गुन्हयासाठी केला गेला. निसंशयपणे न्यायालयाचे अधिकार, न्यायालयाच्या ताब्यात असलेली मालमत्ता जप्त करण्यापर्यन्त विस्तारलेले आहेत, परंतु प्रकरणाच्या परिस्थितीची पर्वा न करता प्रत्येक प्रकरणात जप्तीचे आदेश देणे आवश्यक नसते. अशा प्रकरणाची कल्पना करणे शक्य आहे की, ज्यामध्ये गुन्हयाचा विषय मालमत्ता असु शकते आणि त्या गुन्हयाशी संबंधीत कायदयानुसार त्या गुन्हयाची शिक्षा म्हणुन ती मालमत्ता जप्त केली जावु शकते. त्यामुळे सोन्याच्या विल्ॊवाटीबाबत आदेश देण्याचे न्यायालयाला अधिकारक्षेत्र आहेत. असे ग्हित धरुनसुध्दा, जप्तीचा आदेश हा, या प्रकरणाच्या परिस्थितीत योग्य आदेश नव्हता असे आम्हाला वाअते, कलम ५१७ मध्ये कलमाच्या उत्तरार्धात नमुद केलेल्या परिस्थितीत मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठीची सामान्य तरतुद आहे. कलम ६१ इ स्वतःच न्यायालयाला जप्तीचा दंड ठोठावण्याचा अधिकार देत नाही आणि या कलमाखाली असलेली तुरुंगवास व दंडाची शिक्षा ही नाममात्र शिक्षा आहे, कारण हे स्पष्ट आहे की, कलम केवळ या विश्वासावर आधारलेले आहे की कोणत्याही व्यक्तिच्या ताब्यात असलेली मालमत्ता, ज्याचा समाधानकारक हिशोब दिलेला नाही, ती चोरीला गेलेली मालमत्ता आहे किंवा फसवुन घेतलेली मालमत्ता आहे. हा स्थानिक कायदयाअंर्तगतचा गुन्हा आहे आणि जप्तीच्या दंडाची ठोस तरतुद करणा-या समुद्री सिमाशुल्क कायदयासारख्या कायदयाअंतर्गतचा नाही. कलम ५१७

अंतर्गत जप्ती ही विल्हेवाट लावण्याची एकमेव पध्दत नाही व असे आदेश, ज्या प्रकरणात आरोपीविरुध्द जास्तीतजास्त तीन महिने तुरुंगवास आणि शंभर रुपये दंड एवढी शिक्षा असलेल्या गुन्हयासाठी खटला दउखल केला आहे, त्यामध्ये अगदीच अयोग्य आहेत. मालमत्ता ताब्यात घेण्याचा हक्क असल्याचा दावा करणा-या व्यक्तिकडे मालमत्तेचा ताबा देण्याचा आदेश न्यायालय निश्चितपणे देवु शकत होते. या प्रकरणात अपीलकत्याचर्या ताब्यात सोने सापडले होते व त्याच्या ताब्याबददल इतर कोणताही प्रतिस्पर्धी दावा विचारात घेण्याचे न्यायालयाला सांगण्यात आले नव्हते. ही मान्य असलेली बाब आहे की, ते चोरीचे किंवा फसव्या पध्दतीने मिळविले गेले होते हे सिध्द करण्यासाठी कोणताही पुरावा नव्हता आणि जे काही दिसत होते ते असे होते की, ते चोरीला गेले होते किंवा फसव्या पध्दतीने मिळविले गेले होते असे मानण्याचे कारण होते आणि अपीलकर्ता  न्यायालयाचा समाधानापुरता, त्याच्या ताब्यात ते असल्याचा हिशोब देण्यात अपयशी ठरला. उच्च न्यायालयाला असे वाटले की, सोने हे आफ्रिकेतुन तस्करी करुन भारतात आणले होते, परंतु तसे आहे असे गहीत धरुनसुध्दा कलम ६१ इ अंतर्गत दोषी ठरविण्यासाठी आवश्यक असणा-या केवळ विश्वासाच्या अस्तित्वावर कलम ५१७ अंतर्गत त्याची जप्ती करण्याचे आदेश हे स्पष्टपणे कठोर व अवास्तव आहेत. सबब आम्ही निर्णित करतो की, सोने जप्त करण्याच्या आदेशाचे समर्थन केले जावु शकत नाही.

तदनुसार आम्ही जप्तीचा आदेश रदद करतो आणि निर्देश देतो की, अपीलकत्यार्चे ताब्यात जप्त केलेले सोने त्याला परत दयावे.

अपील मंजुर करण्यात आले.

उत्तरवादीचा एजंट – आर.एच. ढेबर.

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x